मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

११५५३

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय का०वा०
दा. क्र. ११५५३

IRBK-0111773
IRBK-0111773

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय को. नो.
दा. क्र. ११५७३

पैसे

# ज्ञानदेवांचे शिष्य



५. हैबतबाबा पवार

आनंद कार्यालय प्रकाशन

ले. स. कृ. देवध

दा. क्र. - ११७०३ ३३२५ ९।८।६०.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यं राये.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. वाचनालय शाखा.
अनुक्रम ४१७२८ वि. वा. वा.
क्रमांक ३३२५ नोंद दि. ९।८।६०

म. ग्रं. सं. ठाणें. वाचनालय शाखा
दा. क्र. ११७०३ वि.
वा. वा.

ज्ञानदेवांचे शिष्य : ५

# हैबतबाबा पवार

लेखक : स. कृ. देवधर

मूल्य ६० पैसे

आनंद प्रकाशन

प्रकाशक :
य. गो. जोशी
व्यवस्थापक
आनंद कार्यालय
१०१५ सदाशिव : पुणें २

सर्व हक्क स्वाधीन

आवृत्ती पहिली : ऑक्टोबर १९६६

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव पेठ : पुणे

[illegible] शाखा.
[illegible] ८१५०२८ ... वि. ...
क्रमांक ... ३३२५ ... नोंद दि. [illegible]

# हैबतबाबा पवार

IRBK-0111773

## १. राजसेवा

कृष्णा नदीच्या परिसरात लाभलेली शक्ती आणि पराक्रम यांच्या जोरावर नशीब काढण्यासाठी हैबतराव साधासुधा शिपाई गडी म्हणून शिंद्यांच्या पदरी नोकरीस राहिला. दैवानं त्याची साथ केली. राजाश्रयात अंगावर येणारी लहान-मोठी कामे पार पाडीत हैबतरावाचे जीवन चालले होते. वयाबरोबर त्याचा मानमरातबही वाढीस लागला होता. आपला मराठी बाणा कायम ठेवून गादीची अखंड सेवा चालू होती. सेवेत ना खंड ना आळस. सरकार स्वारीच्या शब्दाप्रमाणे रेखीव काम करणारी ही पाणीदार मूर्ती पक्की घडली होती. वयाची साठी आलेली पण तरुणांनी मान खाली घालावी अशी हिम्मत ! मनाचा पीळ अजून कायम होता. पूर्व वयापासून आजपर्यंत इमानाने केलेल्या चाकरीचे समाधान डोळ्यांत तरळत होते. शिंदे–होळकरांच्या वैभवातले हे एक अमोल रत्न होते. या रत्नाचे पैलू दरबारच्या डोळ्याआड होणारे नव्हते. असा एकही दिवस नसे की, दरबारला हैबतरावांची उपस्थिती जाणवली नाही. शिंदे सरकारनेच त्यांना आपले म्हटल्याने त्यांचे

गौरवगान सर्वत्र चालूच होते. कोणत्याही अडचणीच्या प्रसंगी हैबतरावांचा सल्लाच सरकार-स्वारीला काळजीमुक्त करी. त्यामुळे तर सरकार-स्वारीची त्यांच्यावर खास मर्जी. कीर्तीकमाईचे दिवस हळू हळू संपत येत होते. आजपर्यंत मिळविलेल्या सामग्रीवर दिवस कंठीत राहावयाचे त्यांना बरे वाटेना. सूर्य कलला म्हणजे पायाखालची सावलीसुद्धा कलते. न दिसणारी छाया दिसू लागली म्हणजे स्वतःची जाणीव प्रकर्षाने होते. मनुष्यदेह धारण केला त्याचे सार्थक काहीतरी केलेच पाहिजे अशा विचाराने हैबतबाबा अलीकडे सुखावत. देव मानून राजाची सेवा ते करीत होते, स्वामिनिष्ठेलाही अद्याप तडा गेला नव्हता. बोलण्यातली सरदारी कायम होती. तरीही राजा आणि देव यांच्यांत त्यांना या उतारवयात फरक कळू लागला होता. राजापेक्षा त्यांना आता देवाची ओढ वाटू लागली होती; कारण इथला मुक्काम राजाश्रयावर अवलंबून असला तरी पुढच्या मुक्कामात देवच साथी बनतो हे त्यांना पूर्णपणे पटले होते.

## २. निश्चय ठरला

सुप्रभातीच हैबतराव आपल्या बिछान्यावर उठून बसले. शरीर थकत होते पण मन मात्र अजून तरुणच होते. मंचकावर बसूनच त्यांनी देवाला नमस्कार केला. 'प्रभो, आता तुझ्या पायाची चाकरी करावीशी वाटू लागली आहे. माझी म्हाताऱ्याची ही अखेरची इच्छा तुझ्याच कृपेने पुरी होणार आहे.' असे म्हणून प्रार्थना केली. थोडा वेळ स्वस्थ बसले; आणि कशाचा तरी निश्चय करून ते उठले. त्यांच्या मनाने घेतले की, आपण आता देवाचे झालो. ही राजचिन्हे आणि मानचिन्हे देवाकडे जाताना उपयोगी नाहीत. ज्याची त्याला देऊन टाकावी. आपले असेल ते घ्यावे आणि घरी जाऊन प्रभू-चिंतनात वेळ

घालवावा. या विचारातच त्यांनी आपले सकाळचे काम संपवले. सरकारस्वारीला भेटून आपण आपला विचार त्यांच्या कानी घालावा, कोणी दर्शन घेण्यापूर्वीच जाऊन आपण महाराजांचे दर्शन घ्यावे. जरा मोकळेपणाने बोलता येईल. विचाराच्या प्रवाहातच त्यांनी आपल्या चाकराला हाक मारली. घोडा तयार करायला सांगितला आणि त्याच्या पूर्ततेची वाट पाहात ते पुढील तयारीस लागले.

दिवाणखान्याच्या लगतच्या खोलीत ते वळले. तेथे व्यवस्थितपणे मांडलेल्या आपल्या निरनिराळ्या दरबारी पोशाखांकडे नजर टाकली. मोठ्या राजांच्या हातून अनेक वेळी बक्षीस मिळालेल्या तलवारी भिंतीवर लटकत होत्या. त्यांनी दरबारी पोशाख अंगावर चढवला. आपली आवडती रत्नमुठीची समशेर कटीवर लटकविली. सरदारी थाटाचे पागोटे चढवून स्वारी दिवाणखान्यात आली. इतक्यात घोडा तयार असल्याची वर्दी घेऊन नोकर आला. त्याच्या विनंतीला हुंकाराची साथ देत त्याच्या मागोमाग ते बाहेर पडले. घोड्यावर मांड टाकली आणि उगवत्या सूर्याबरोबर त्यांनी राजप्रासादाकडे कूच केले.

## ३. राजदर्शन

उगवत्या सूर्याचे कोवळे किरण अंगावर घेऊन त्या तेजोनिधीचे स्वागत करण्यासाठी राजाची स्वारी मुख्य दरवाजाकडे वळली. तोच देवडीवरील पहारेकऱ्यांचे नमस्कार स्वीकारत आत येणाऱ्या हैबतरावांचे त्यांना दर्शन झाले. धीमेपणाने पावले टाकीत हैबतराव जवळ आले. त्यांचा दरबारी मुजरा स्वीकारीत विस्मित मुद्रेने राजे म्हणाले,

‘ हैबतराव ! अगदी सकाळीच येणं केलंत ? काही विशेष ? ’

‘ होय. तसंच विशेष काम निघालं म्हणून सरकारच्या दर्शनाला

आलो—' कटीची समशेर सरकार स्वारीच्या पायाशी ठेवीत अत्यंत धीर-गंभीर आवाजात हैबतराव पुढे बोलू लागले—



' सरकार, चुकली मुकली, हातून झाली तशी चाळीस वर्षं या गादीची सेवा केली. माझ्या आयुष्याचा सूर्य आता ढळला. माझ्या लांब पसरणाऱ्या सावल्या मला आता स्पष्ट दिसू लागल्या. उरलेले चार दिवस या विश्वपतीच्या सेवेत घालवावेत आणि आनंदी मनानं या जगाचा निरोप घ्यावा असं वाटू लागलं आहे. म्हणून तर आपल्या पायाशी निरोप घेण्यासाठी आलो आहे. कृपा करा या गरीब चाकरावर आणि मला माझ्या गावी जाण्याची आज्ञा द्या. '

' हैबतराव ! तुम्ही जाणार ? आणि असे अचानक ? कोणी सांगितलं आपणाला हे—' महाराज.

' कोण सांगणार ? माझ्याच मनानं मला जागं केलं. माझा अगदी निश्चय झाला आहे. ' हैबतराव म्हणाले.

गंभीर चेहरा करून सरकार म्हणाले, 'खरं आहे तुमचं म्हणणं. तुमच्या इच्छेच्या आणि ईशसेवेच्या आड येणं मला बरं वाटत नाही. परंतु तुम्ही नाहीत म्हणजे दरबारची शोभा नाही. तुमचं रोज घडणारं दर्शन नाही म्हणजे आमचं पितृछत्रच नाहीसं झाल्यासारखं वाटतं मला. थोरल्या महाराजांपासून आमच्या या गादीला तुमचे खरे खुरे आशीर्वाद आहेत.'

त्यांना मध्येच थांबवत हैबतराव म्हणाले, 'थोरले सरकार स्वतःच देवमाणूस होते. त्यांच्या समोर जो जो आला तो देव बनून गेला. त्यांच्यामुळंच या गादीची सेवा मी करू शकलो. पण आता हे शरीर थकलं. केस पिकले. व्हावी अशी सेवा या चाकराच्या हातून घडणार नाही. म्हणून म्हणतो, महाराज आपल्या पायाशी आलेल्या या सेवकाला निरोप द्या.'

'तुमच्या स्वामिनिष्ठेला माझे शतशः प्रणाम आहेत.' रुद्ध कंठाने हैबतरावांना आलिंगन देत सरकार उद्‌गारले. ओलावलेल्या नेत्रांनी सरकारस्वारीने हैबतरावांना निरोप दिला.

आपली सरदारी, करारीपणा आणि अभिमान सरकार-स्वारीच्या पायाशी ठेवून हैबतरावांनी राजप्रासाद सोडला.

## ४. ग्वाल्हेर नगरीला अखेरचा प्रणाम

हैबतरावांनी राजप्रासाद सोडला आणि जाता जाता आपल्या स्नेहीमंडळीचा निरोप घेत ते घरी आले. नेहमीप्रमाणेच दिवाणखान्यात न बसता सदरेलाच बसून त्यांनी आपल्या सर्व नोकरांना पाचारण केले. आपला बेत त्यांना सांगितला. ज्याच्या त्याच्या इतमामाप्रमाणे प्रत्येकाला काही ना काही दिले व फक्त काही अलंकार व रोकड तेवढीच बरोबर घेतली. आपल्या सर्व सेवकांचा

साश्रू नयनांनी निरोप घेतला आणि ते घोड्यावर स्वार झाले. नगरवेशी-जवळ येताच त्यांनी नगराकडे तोंड केले, हात जोडले आणि ते म्हणाले, 'नगरदेवते, आजपर्यंत जसं सर्वांचं कल्याण केलंस तसंच यापुढेही सर्वांना सुखी ठेव. माझा तुला हा अखेरचा प्रणाम' त्यांनी नगरवेस सोडली आणि ते दक्षिणेकडे वळले.

## ५. दरोडेखोरांच्या संगतीत

ईशसेवेची इच्छा मनी धरून हैबतराव मुक्काम करीत करीत आपल्या आर्फळे गावी येत होते. मन मानेल तेथे मुक्काम करावा आणि पुढे चालू लागावे असा त्यांचा प्रवास चालू होता. एकदा असेच पौर्णिमेचे चांदणे पाहून ते मार्ग आक्रमीत होते. मुखी भगवंताचे नाव होते. बराच वेळ ते असेच चालले होते. जवळपास मुक्कामाचे काही स्थळही दिसेना. ते तसेच पुढे चालले होते. घटकाभर गेला असेल



नसेल. 'थांब !' एकदम त्यांच्या कानावर दरडावणीचा आवाज आला. ते इकडे तिकडे पाहतात तोच आठ-दहा सशस्त्र दरोडेखोरांनी त्यांना वेढले. आपली शस्त्रे सज्ज केली. त्यांच्या शस्त्राकडे नजर जाताच हैबतरावांचे रक्त उसळले; पण हाती ना शस्त्र ना विचार करायला वेळ. दरोडेखोरांचा नाईक पुढे झाला. काय होते आहे हे समजण्याच्या आतच हैबतरावांचे हात बांधले गेले. त्यांचा घोडा सोडून देण्यात आला. नाईक साथीदारांना म्हणाला, 'बरी शिकार मिळाली. ह्या समोरच्या झाडाला बांधा याला आणि घ्या काय चीजवस्तू असेल ती काढून.' नाइकाच्या म्हणण्याप्रमाणे साथीदारांनी हैबतरावांना एका झाडाला बांधले. त्यांच्याजवळ असलेले द्रव्य काढून घेऊन नाइकाच्या समोर एका घोंगडीवर ते ओतण्यात आले. नाइकाने आपले दोन्ही हाताचे पंजे त्या द्रव्यराशीत खुपसले. आनंदाने त्याचा चेहरा फुलला होता. 'खूप कमाई झाली आज. गड्यांनो आता बरीच रात्र झाली. टाका इथंच घोंगडीवर अंग. पहाटे उठून जाऊ वसतीवर.' नाईक म्हणाला. सर्व दरोडेखोरांनी आपापल्या घोंगड्या पसरल्या आणि ते लवंडले. नाईकही तेथेच पडला.

झाडाला बांधून ठेवलेल्या हैबतबाबाने मनी विचार केला. मी कोणाचे काही वाकडे केले नाही आणि ईश्वराने माझ्यावरच असा प्रसंग का बरे आणावा ? पांडुरंगाची इच्छा असेच म्हणावे लागेल. आता या संकटातून सुटण्याचा मार्ग म्हणजे निर्वाणीचा सखा एक पांडुरंग ! हैबतबाबाने—

आता माझ्या भया । निवारावे देवराया ।

म्हणून आर्त स्वराने पांडुरंगाची प्रार्थना केली. सर्व दरोडेखोर गाढ झोपी गेले होते. रात्र सरू लागल्याबरोबर निशापती पश्चिम क्षितिजावर

विसावला. पहाटेचा गार वारा वाहू लागला. तरीपण हैबत-बाबाचा पांडुरंगाचा सारखा धावा चालूच होता. डोळे मिटले होते. पांडुरंगाची मूर्ती ध्यानात साठविली होती. शरीर झाडाला बांधले गेल्याने कोमेजून गेले होते. खऱ्या प्रेम-आव्हानाला पांडुरंग कटिकरबद्ध होऊन सदैव हजर असतो. हैबतबाबांचे नशीब मोठे होते. पांडुरंगाने नाइकाच्या स्वप्नात प्रवेश केला. साथीदारांच्या मनात प्रवेश केला. सर्वांना एकच संदेश. 'झाडाला बांधलेल्या या पुरुषाला ताबडतोब मुक्त करा. तो माझा भक्त आहे. माझ्याकडे येऊ लागला आहे. तुम्ही त्याला अडथळा करणारे कोण? सकाळी सूर्योदयाबरोबर त्याला मुक्त न कराल तर तुमच्यावर संकट कोसळेल.' सांगणे संपताच पांडुरंग अंतर्धान पावले. नाईक खडबडून जागा झाला. त्याच्याजवळ त्याचा एक साथीदार धापा टाकत उभा होता. नाइकाचा माग काढीत त्याच्या वस्तीवरून तो आला होता. नाईक जागा होताच त्याला मुजरा करून तो म्हणाला,

'धनी, साखरेनं सगळ्यांची तोंडं गोड करा. वहिनीबाई पाहोल्यापरी बाळंत झाल्या. मुलगा झाला. तुम्ही वस्तीवर नाही. तुमचा माग काढत आलो. चला घरी.'

नाइकाने त्याच्या पाठीवर शाबासकी दिली. त्याचा चेहरा आनंदाने खुलला. तो साथीदारांना म्हणाला, 'गड्यांनो उठा, आपण देवाचा फार मोठा अपराध केलाय.'

'आम्हालाही पांडुरंगानं तसंच सांगितलं. ह्या बाबाला सोडायला सांगितलं. सोडलं नाही तर आपल्यावर संकट कोसळेल.' —साथीदार.

'उठा. त्याला मोकळा करा.' नाईक म्हणाला.

त्याच्या साथीदारांनी त्याला मोकळे केले. नाईक पुढे झाला. हैबत-रावांच्या पायावर डोके ठेवून त्याने त्यांची क्षमा मागितली, तो म्हणाला,

'बाबा मला क्षमा करा. मी तुमचा छळ केला. तुमच्या जवळची संपत्ती हिरावून घेतली. तुम्हाला झाडाला बांधून ठेवलं. तुम्हाला हीन लेखलं. पांडुरंगानं आम्हाला चांगली अद्दल घडविली. तुमच्या पायाच्या दर्शनानं मला मुलगा झाला. बाबा तुम्ही साक्षात् देव आहात. मला क्षमा करा.' गहिवरलेल्या मनाने हैबतरावांच्या पायावर त्याने डोके ठेवले. त्याला उठवीत हैबतराव म्हणाले, 'तुझं भाग्य फार थोर आहे. ऊठ, पांडुरंगाचं एक वेळ दर्शन घडावं म्हणून अनेक जन्म तपस्या करावी लागते. तरीही त्याची कृपा होणं फार फार कठीण. तुला पांडुरंगानं दर्शन देऊन मला मुक्त करायला सांगितलं. धन्य आहेस तू. गतजन्मीचं पुण्य फळाला आलं.' त्याला हाताला धरून हैबतरावांनी उठविले.

नाईक दिङ्मूढ झाला होता. त्याच्या तोंडातून शब्द फुटेना. बराच वेळ शांततेत गेला. त्या शांततेचा भंग करीत नाईक हैबतरावांचे हात हातात घेत म्हणाला, 'बाबा आज ,तुम्ही आमचे पाव्हणे. गरिबाच्या झोपडीत चला. काय असेल ती मीठ-भाकर गोड मानून घ्या. चला.'

'नाही. मला तू मोकळं केलंस. आता माझ्या पांडुरंगाकडे मला गेलं पाहिजे. पण तू सोडलं नसतंस तर माझा पांडुरंग तूच होतास.' हैबतराव म्हणाले.

'नाही. असं नाही होणार? या गरिबाच्या म्हणण्याला नाही म्हणू नका. तुमचे माझ्यावर मोठे उपकार आहेत. आजपासून ही दरोडेखोरी मी सोडली. पुन्हा मी असं करणार नाही. पण एकदा आपण माझ्या झोपडीत या.' नाईक म्हणाला.

नाइकाची काकुळती पाहून हैबतरावांनी त्याचे म्हणणे मान्य केले. त्याचा साधासुधा पाहुणचार त्यांनी स्वीकारला. नाइकाने त्याची घेतलेली सर्व संपत्ती त्यांना परत केली. शिवाय आपल्या जवळची आणखीही संपत्ती त्यांना अर्पण केली. शेला-पागोटे दिले. नवजात बालकाला त्यांच्या

पायावर घातले. त्यांचे आशीर्वाद घेतले. हैबतरावांनी त्याला आणि त्याच्या साथीदाराला धन्यवाद देत सर्वांचा निरोप घेतला. नाईक आणि त्याचे साथीदार यांनी त्यांना सीमेपर्यंत पोहोचविले. हैबतरावांचा पुढचा प्रवास पांडुरंगाच्या नामस्मरणात चालू झाला.

## ६. आळंदीत

दरोडेखोरांच्या तावडीतून सुटल्यावर जीवनाची अशाश्वतता पाहून त्यांचे मन विरागी बनले. आपले उर्वरित आयुष्य आपल्या गावी जाऊन फुकट घालविण्यापेक्षा ईशसेवेत, संतसेवेत घालवून मनुष्यजन्माचे सार्थक करावे असे त्यांच्या मनाने घेतले. प्रवास करीत करीत ते पुण्यास आले तेव्हा त्यांना आळंदीच्या ज्ञानदेवांचे स्मरण झाले. ज्ञानदेवांना माउली म्हणतात या एकाच गोष्टीने त्यांचे मातृप्रेम जागृत झाले. आपण अनाथ नाही या केवळ कल्पनेनेच ते सुखावले. त्यांच्या संतसेवेच्या विचाराला पुन्हा जोराने चालना मिळाली. जगाचे मातृत्व भूषविणाऱ्या या मातेचे प्रेम संपादन करावयाचे आणि केवळ त्याचसाठी राहिलेले आयुष्य कारणी लावायचे असे मनाशी ठरवून ते आपल्या गावाकडे न जाता आळंदीस निघाले.

सूर्य पश्चिमगिरीच्या आड झाला होता. पक्षी आपापल्या घरट्याकडे धाव घेत होते. बासरीच्या सुरेल स्वरावर गुराख्याच्या मागून गुरे घराकडे चालली होती. हैबतरावांनी याच वेळी आळंदीत प्रवेश केला. ज्ञानेशाच्या समोर जाऊन त्यांनी प्रार्थना केली आणि ते तेथेच विसावले.

आपल्या आणि या मातेच्या प्रेमाआड येणारी आपली सर्व संपत्ती त्यांनी माउलीच्या चरणी अर्पण केली आणि ते काळजीमुक्त झाले. सकाळपासून दुपारपर्यंत ज्ञानदेवांच्या नावाचा जप करीत त्यांच्या समोर बसावयाचे. दुपारी चार घरे मधुकरी मागायची. भूक शमल्यावर

शिल्लक राहिलेले अन्न वाटून टाकायचे आणि पुन्हा ज्ञानदेवांच्या समोर बसून त्यांच्या नामस्मरणात तल्लीन व्हायचे असा त्यांचा कार्यक्रम चालला होता. परंतु त्यातही त्यांना एकान्तवासाची विशेष आवड. तो ज्ञानदेवांच्या मंदिरात त्यांना मिळत नसे. तेथून अखेर त्यांनी आपला मुक्काम हलविला आणि ते सिद्धबेटात आले. सिद्धबेटातल्या आश्रमतुल्य वातावरणात त्यांचे मन अधिकच रमले. सकाळपासून संध्याकाळपर्यंत ज्ञानेशांच्या ध्यानसुखात ते मग्न असत. ज्ञानेश्वर म्हणतात त्याप्रमाणे

क्षुधा काय जाहली । निद्रा केऊती गेली ।
हे आठवणही हारपली । न दिसे वेगा ।।

याप्रमाणे त्यांची स्थिती झाली. केवळ देह जगला पाहिजे म्हणून भूक लागेल तेव्हा निंबाचा पाला खावा, तहान लागेल तेव्हा इन्द्रायणीचे पवित्र पाणी प्यावे आणि क्षुधेतृषेचा दाह कमी करावा. याप्रमाणे एक तप झाले. लोकांना त्यांच्या तपस्येची जाणीव असे. आळंदीचे लोक त्यांना भेटायला आले म्हणजे हैबतरावांचे नेत्र आनंदाने ओलावत. माउलीच आली म्हणून त्यांचा ते आदर करीत. जो जो भेटेल तो ज्ञानदेव अशा संवेदनेत ते नेहमी असत. हैबतराव आता वृद्ध झाले होते. लोकांनी त्यांना सिद्धबेटातून आळंदीत आणले. त्यांच्या सर्वथैव श्रेष्ठत्वामुळे लोक त्यांना आता बाबा या प्रेमळ नावानेच संबोधीत. त्यांच्या सान्निध्यात बाबांचा काळ सुखाने चालला होता. ज्ञानदेवाच्या सेवेतही खंड नव्हता.

असेच एक दिवस ते माउलीच्या समाधीसमोर स्वस्थचित्त बसले होते. त्यांना आपला मागील काळ आठवला. आपण दरोडेखोरांच्या तावडीतून सुटलो याची स्मृती होताच त्यांना पांडुरंगानेच आपल्याला त्या संकटातून सोडविले याची आठवण झाली. बारा वर्षांच्या काळात

आपण पांडुरंगाला विसरलो. ज्याने आपल्याला या माउलीची भेट करून दिली त्या पांडुरंगाला आपण विसरलो. बारा वर्षांच्या अवधीत आपण एकदाही त्याच्या दर्शनाला गेलो नाही याचे त्यांना फार वाईट वाटले. त्यांचे डोळे वाहू लागले. न कळत त्यांनी हात जोडले आणि ते माउलीला म्हणाले, ' माउली, मला पंढरीच्या पांडुरंगानं तुझ्याजवळ आणलं. परंतु मी कृतघ्न, त्यालाच विसरलो. केवढा रोष होईल त्याचा माझ्यावर. माउली मला क्षमा कर. मला सामर्थ्य दे. मी पंढरीला जाऊन त्याला भेटेन त्याची क्षमा मागेन. मला एकदा त्याची भेट घडव. ' डोळे टिपत कसल्यातरी निश्चयाने ते तेथून उठले.

## ७. जाईन गे माये, तया पंढरपूरा

आपला पांडुरंगभेटीचा मानस बाबांनी लोकांजवळ बोलून दाखविला. लोकांनी त्यांना सांगितले—' बाबा, हा ज्येष्ठाचा महिना. आठ दिवसांवर आषाढ आला. आषाढ म्हणजे पावसाचं राज्य. इतके थांबलात तसं आणखी चार महिने थांबावं. पावसाळ्यात आपल्याला त्रास होईल—' लोकांचे म्हणणे बाबांना मानेना. ते म्हणाले, ' आषाढी एकादशीच्या दिवशी पांडुरंगाचं दर्शन घ्यावं. त्या दिवशी दर्शन देण्यासाठी पांडुरंग स्वतःच भक्ताच्या हृदयात अवतरतो. पंढरीतला प्रत्येक मनुष्य पांडुरंग पांडुरंग म्हणून कान धरून चंद्रभागेच्या वाळवंटात देहभान विसरून नाचतो. आपली सर्व पातकं धुऊन टाकतो. मला त्याच दिवशी पांडुरंगाचं दर्शन घ्यायचं आहे. जन्मजन्मांतरीची सर्व पापे त्या दिवशी चंद्रभागेत सोडून मला पवित्र व्हायचं आहे. मी जाणार. अगदी निश्चितपणे जाणार. '

बाबांचा निश्चय पाहून लोक स्तब्ध झाले. बाबांच्यावर लोकांची अमाप माया होती. बाबांच्या संगतीने आळंदीचे अनेक लोकही त्यांच्या

बरोबर जाण्यास तयार झाले. ज्येष्ठ वद्य अष्टमीच्या दिवशी प्रस्थान ठेवले. ज्ञानदेवांच्या पादुकांची पूजा करून बाबांनी त्या आपल्या हाती घेतल्या. येतो म्हणून माउलीचा निरोप घेतला आणि नवमीच्या दिवशी सूर्योदयाबरोबर, ज्ञानदेव-तुकारामाच्या मंत्रगजरात आणि टाळ-मृदंगाच्या घोषात बाबा पंढरपुरास निघाले. रोज दहाबारा मैल चालावे, पाण्याचा आश्रय पाहून मुक्काम करावा. जिथे मुक्काम पडेल तेथे कीर्तनभजनाचा अलोट आनंद लुटावा. पुन्हा प्रभाती माउलीच्या पादुकांची पूजा करावी. अनन्यभावे माउलीची प्रार्थना करावी आणि ज्ञानदेव-तुकारामाच्या मंत्रघोषात तल्लीन होऊन पुढील प्रवासाला लागावे. ज्या ज्या गावातून ज्ञानदेवांच्या पादुका जात तेथील लोक बाबांचे आणि पादुकांचे आदराने स्वागत करीत. ज्ञानदेवांच्या पादुका गळ्यात घालून बाबा जाऊ लागले म्हणजे गावोगावचे लोक त्यांना सामोरे येत. माउलीच्या पादुकांची प्रेमभावाने पूजा करीत आणि आपल्या गावाच्या सीमेपर्यंत बरोबर जाऊन निरोप घेत. अशा प्रकारे ही यात्रा आषाढ शुद्ध दशमीच्या दिवशी पांडुरंगाच्या भक्तिपुरीत पोहोचली. बाबांचे मन आनंदाने भरून गेले. आपला संकल्प पुरा झाल्याचे समाधान त्यांना लाभले.

एकादशीच्या दिवशी पहाटे बाबांनी चंद्रभागेवर जाऊन स्नान केले. पादुकांची पूजा केली. त्या गळ्यात घातल्या आणि ते पांडुरंगाच्या दर्शनाला निघाले. वाळवंटातून येताना पांडुरंगाच्या भक्तांचे आशीर्वाद मिळवीत ते चालले होते. चोखामेळ्याच्या समाधीची त्यांनी पूजा केली. अष्टौप्रहर पांडुरंगाच्या आज्ञेची वाट पाहात उभ्या असलेल्या चोखोबांचा आशीर्वाद घेतला. नामदेवांच्या पायरीजवळ बाबा आले. पांडुरंगाला आपल्या भक्तीने वेड लावणारा नामदेव पांडुरंग दर्शनार्थ येणाऱ्या संतांची वाट पाहात उभा होता. नामदेवाचे ज्ञानदेवावरील प्रेम आठवून

बाबा तेथेच टेकले. पादुकांची आणि नामदेवाची भेट झाली. बाबांचा आनंद दुणावला. तेथेच थांबून क्षणभर त्याच सुखानंदात बाबा रमले. पुन्हा पादुका घेतल्या आणि ते पांडुरंगाच्या भेटीसाठी वर आले. इतक्या दिवसांचे प्रेमच जणू साकारले. चैतन्याचा गाभाच या विटेवर अवतरलेला पाहून बाबांचे हृदय उचंबळून आले. त्यांनी पांडुरंगाकडे धाव घेतली. गळ्यातल्या पादुका विठ्ठल-चरणी ठेविल्या. त्याच्या चरणावर मस्तक नम्र केले आणि पाझरल्या नेत्रांनी ते पांडुरंगाकडे पाहात म्हणाले, ‘ पांडुरंगा, माझ्या गत जन्मीच्या पुण्याईनं आणि मातापित्यांच्या आशीर्वादानंच तुझं हे अमोल दर्शन घडलं. तुझ्याच कृपेनं मी त्या दरोखेडेखोरांच्या हातून वाचलो. माउलीच्या छायेत मला असंच अखेरपर्यंत ठेव. तिची माझी ताटातूट करू नका ’ प्रार्थना संपली. बाबांनी पुन्हा पादुका गळ्यात घातल्या. बरोबरच्या लोकांसमवेत सबंध दिवस हरिचिंतनात घालविला. दुसऱ्या दिवशी द्वादशी. बाबांनी आपल्या हातांनी स्वयंपाक केला. पांडुरंग, ज्ञानेश्वर माउली, ब्राह्मण, अतिथी यांची पूजा करून त्यांना नैवेद्य समर्पण केला आणि उर्वरित प्रसाद आपल्या बरोबरच्या लोकांसमवेत सेवन करून, पूर्णब्रह्माला उदरी साठवीत एकादशीचे पारणे फेडले.

त्रयोदशीच्या दिवशी सूर्योदयाबरोबर पांडुरंगाचा निरोप घेऊन बाब पादुका घेऊन निघाले. गेल्या मार्गाने परत आळंदीस आले. समाधीवर पादुका ठेवून झालेले सर्व सुखदुःख माउलीला सांगितले. झाले ! पुढील वर्षापर्यंतचा कार्यक्रम चालू झाला. अव्याहत चाललेला हा कार्यक्रम बाबा नव्वद वर्षांचे झाले तरी चालूच होता. या वर्षी बाबा फारच थकले होते. वारी कशी काय पार पडते याचीच सर्वांना चिंता होती. बाबांचा देह कृश झाला होता. मधून मधून ताप येई. त्यामुळे तर ते अधिकच अशक्त झाले होते. परंतु आपले व्रत सोडायला ते तयार नव्हते. दरवर्षी,

प्रमाणे बाबांनी ज्येष्ठ वद्य अष्टमीला प्रस्थान ठेवले आणि नवमीच्या दिवशी पुढचा मार्ग आक्रमण्यास सुरुवात केली. प्रत्येक दिवशी बाबांची तब्येत अधिकाधिक बिघडू लागली. त्यांना ताप येऊ लागला. तरी पण व्रतखण्ड मात्र नाही. आषाढ शुद्ध दशमीस बरोबरच्या लोकांसह बाबा पंढरपुरास येऊन दाखल झाले. वरुण राजाने त्यावेळी संतत धार धरली होती. बाबांना बराच त्रास झाला. त्यांचा ताप वाढला. तशाच स्थितीत एकादशीस त्यांनी पांडुरंगाचे दर्शन घेतले. नेहमीप्रमाणे प्रार्थना केली आणि ते मुक्कामाच्या जागी आले. बाबांचा ताप अधिकच वाढला भोवतालचे लोक घाबरले. वैद्य आले. दवापाणी चालू झाले. द्वादशी उजाडली. बाबा म्हणाले, ' मला कुणीतरी पांडुरंगाचे चरणतीर्थ आणून द्या. मला एकादशी सोडू दे. ' एकाने बाबांना तीर्थ आणून दिले पांडुरंगाला वंदन करीत ज्ञानदेवाचे नाव घेत बाबांनी तीर्थ सेवन करून



एकादशी सोडली. बाबांची नाडी धरून बसलेले वैद्य काळजीयुक्त झाले. बाबांची नाडी लागेना. लोक चिंतातुर झाले. काहींनी बाबांना कळवळून हाक मारली. बाबांनी ओ दिली. नाडी सुटली अशा स्थितीतही बाबा ओ देतात याचे त्यांना आश्चर्य वाटले. बाबांना पुन्हा एकाने हाक मारली. बाबांनी ओ दिली. बाबा म्हणाले, ‘ घाबरू नका. मी इथं मरणार नाही. माझ्या आईच्या मांडीवरच मला अखेर झोपायचं आहे ’ बाबांचा आत्मविश्वास पाहून लोक थक्क झाले.

## ८. ज्ञानेशांना जीवनसुगंध वाहिला

त्रयोदशीच्या दिवशी पाऊस थांबला होता. बाबांना बैलगाडीत झोपविण्यात आले. त्यांच्या सन्निध पादुका ठेवण्यात आल्या. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे सर्वांनी पांडुरंगाचा निरोप घेतला आणि त्यांनी आळंदीकडे कूच केले. रोज सकाळी बाबा पादुकांचे तीर्थ घेत. अंगात ताप तसाच होता. वैद्य उपचार करीत होते, पण उतार कसा तो नव्हताच. यात्रा



हैबतबाबांनी चालू केलेला वारीचा

चालली होती. मध्येच केव्हा केव्हा बाबा विचारायचे, ' आली का आळंदी ? '

' नाही अजून लांब आहे–'

' मला माझ्या माउलीला भेटायचं आहे. माझा जीव तिला भेटायला अधीर झाला आहे. आळंदी आली म्हणजे मला सांगा–' बाबांनी असे म्हणावे. पुन्हा डोळे मिटावेत आणि स्वस्थ पडून राहावे.

बाबांची जीवनज्योत मंदावत होती. प्रत्येक क्षण मोलाचा होता. केव्हा काय होईल याचा नेम नव्हता. बाबांची गाडी मजल दरमजल करीत सासवडला आली. बाबांनी सोपानदेवांना हात जोडले. क्षीण स्वरात ते म्हणाले, सोपानकाका, माउलीला भेटायला चाललो आहे. पण हा रस्ता काही संपत नाही. माझ्यावर कृपा करा. माझी आणि माझ्या माउलीची भेट घडवा. ' त्यांना मनोभावे नमस्कार करून बाबा स्वस्थ झाले. बोलण्याच्या श्रमाने त्यांना धाप लागली. लोक त्यांना समजावणीच्या स्वरात म्हणाले,



उपक्रम अव्याहत चालू आहे.

'आता काही आळंदी दूर नाही. आपण स्वस्थ असावं' त्यांचे बोलणे बाबा ऐकून घेत आणि ठीक म्हणून पुन्हा डोळे मिटून स्वस्थ पडत.

आषाढ वद्य एकादशीच्या दिवशी सूर्यास्तानंतर दोन घटकांनी बाबा आळंदीत आले. लोकांनी बाबांना उतरविले. बाबा म्हणाले, 'द्या मला त्या पादुका. मला माझ्या आईकडे जाऊ दे. माझी आई माझी वाट पाहाते आहे. मला तिच्या मांडीवर झोपायचं आहे. आणा त्या पादुका.' लोकांनी बाबांच्या हातांत पादुका दिल्या. मस्तकी लावून त्यांनी त्या हाती धारण केल्या आणि चालत ते समाधीजवळ गेले. पादुका समाधीवर ठेवल्या. 'माउली मला जवळ घे. मी आलो आहे. माऽऽऊऽली' म्हणून त्यांनी समाधीला मिठी मारली. मस्तक समाधीवर ठेवले आणि आपला जीवनसुगंध माउलीला अर्पण केला.

## ९. भू-मातेच्या कुशीत

बरोबरच्या लोकांनी बाबांचा पार्थिव देह बाहेर आणला. त्यांचेही नेत्र दुःखाने पाणावले. त्याच वेळी वरुणानेही अश्रू ढाळायला सुरुवात केली. काही करता येण्याजोगे नव्हते. वरुणाचे दुःख आवरेपर्यंत थांबणे प्राप्तच होते. बाबांचा पार्थिव देह मध्ये ठेवून सर्वजण भोवती बसले होते. पहाटेच्या वेळी त्यांना जरा डोळा लागला. ज्ञानदेवांनी सर्वांच्या स्वप्नात येऊन सांगितले, 'बाबांचा देह माझ्या दरवाज्यात पुरा. त्यांची शेवटची इच्छा होती ती.' ते नेहमी म्हणत असत 'माझ्या माउलीच्या दर्शनाला जो जो कोणी येईल त्याची पदधूली माझ्या देहावर पडावी म्हणजे मी उद्धरून जाईन.' प्रभात झाली. प्रत्येकाने आपले स्वप्न सांगायला सुरुवात केली. ज्ञानदेवांचा आशय सर्वांनी ओळखला वरुणाचे दुःख आवरले होते. महाद्वारात पुष्पे, बुक्का आणि चंदन

यांच्या सुगंधाने भरून गेलेल्या जागी बाबांचा देह पृथ्वीमातेच्या कुशीत ठेवण्यात आला. त्यावर एक पायरी बांधण्यात आली. याच पायरीला



'हैबतरावाची पायरी' असं म्हणतात. माउलीच्या दर्शनाला येणारा प्रत्येकजण प्रथम तिची पूजा करतो. तिला वंदन करतो. बाबांचा आशीर्वाद घेतो आणि मग माउलीच्या दर्शनाला जातो.

## १०. पालखी

हैबतबाबांनी चालू केलेला हा वारीचा उपक्रम अव्याहत चालू आहे. फक्त पादुका आता गळ्यात बांधून न नेता पालखीतून नेतात. पालखीत मखमलीच्या आसनावर ज्ञानदेवांच्या पादुका ठेवतात. पालखी किनखाबांनी आच्छादित असते. बरोबर एक जरीचे निशाण, एक अबदागीर, छत्री, चौरी असतात. एखाद्या सम्राटालाही लाजवील अशा थाटात आणि हजारो भाविकांच्या 'ज्ञानदेव-तुकारामाच्या' गजरात

आळंदीहून दर ज्येष्ठ वद्य नवमीस निघून आषाढ शुद्ध दशमीस पालखी पंढरपुरास जाते. भक्तांचे शिरोमणी नामदेव पंढरपूरच्या वेशीवर ज्ञानियांच्या राजाचे आणि बरोबरच्या अन्य संतांचे स्वागत करून त्यांना पंढरपुरात आणतात. पालखीचा सोहाळा शब्दाने वर्णन करणे अशक्य आहे. प्रत्येकाने त्याचा प्रत्यक्ष आस्वाद घ्यावा आणि धन्य व्हावे यापेक्षा त्याबद्दल अधिक लिहिणेच अशक्य.

पुंडलीक वरदा हरिविठ्ठल ॥
श्री ज्ञानदेव तुकाराम ॥

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम....६७५२८.... वि........
क्रमांक....३३२५....नोंद दि........

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
....११५६३ नों दि ........
वि.

IRBK-0111773

IRBK-0111773